श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई –४०००२८
S.k.Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt of Maharashtra)
TEL : 022-6249 1111, 022- 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दिनांक : १५/१२/२०२५

# प्रथम मुदतवाढ
# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय : श्रीसिध्दिविनायक न्यासातील IT infrastructure health check report साठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत**

श्रीसिध्दिविनायक न्यासातील IT infrastructure health check report साठी सिलबंद लिफाफ्याद्वारे दरपत्रके मागविण्यात आली होती परंतु दोनच मोहरबंद दरपत्रके प्राप्त झाल्याने प्रथम मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दिचा दिनांक | : सोमवार | ०८ डिसेंबर, २०२५ |
| दरपत्रकाचा सादर करण्याचा अंतिम दिनांक | : शुक्रवार | १९ डिसेंबर, २०२५, सायं ५.०० वाजता |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : शनिवार | २० डिसेंबर, २०२५, दु. २.०० वाजता. |

अटी व शर्ती –

१. मोहोरबंद दरपत्रकाचा दोन A4 लिफाफा लाखेने सिलबंद करून प्रतिक्षालयाच्या तळ मजल्यावर टपाल कार्यालयात सादर करावा.

२. न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात मोहोरबंद दरपत्रकांचे दोन A4 लिफाफे उघडण्यात येतील.

३. दरपत्रक सादर करताना दरपत्रकातील (BOQ) नमूदप्रमाणे रक्कम भरावी.

४. तांत्रिक कागदपत्रे (Technical Document) व मुल्य दर (BOQ) असे दोन A4 लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकारांनी तांत्रिक कागदपत्र लिफाफा व मुल्य दर लिफाफा असे दोन वेगवेगळे लिफाफे सादर करावयाचे आहे.

५. लिफाफे लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मुल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

६. दरपत्रक सादर करताना सोबत जोडावयाची कागदपत्रे.

अ) कंपनी नोंदणी दाखला (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट)
ब) जी.एस.टी. नोंदणी दाखला
क) आयकर नोंदणी पॅन कार्ड
ड) सन २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ आय.टी.आर. रिटर्नस फाईल प्रत. (आर्थिक वर्ष)
इ) ३ वर्षाचा अनुभवाचा दाखला.

या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात. अन्यथा दरपत्रकधारकाला अपात्र ठरविण्यात येईल.

७. ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्तीतमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय न्यासाने घेतलयास आपणास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

८. दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेउन येणे.

९. दरपत्रकधारकारांनी सर्व BOQ मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा.वाहतूक खर्च) मुल्य दरामध्ये सामाविष्ट करून रक्कम भरावी.

१०. दरपत्रकधारकाचे दुकान/फर्म/कंपनी किमान ३ वर्षापुर्वीची असणे आवश्यक आहे.

११. कार्यदेशाप्रमाणे काम करीत असल्याबाबत परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

१२. प्रचलित अधिनियम/नियमातील तरतूदीनुसार देयकामध्ये आवश्यक ती कर कपात केली जाईल.

१३. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१४. काम पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१५. कंत्राटदाराने नियुक्त केलेली पर्यवेक्षण करणाऱ्या व्यक्तीने न्यास प्रशासनासोबत समन्वय साधणे आवश्यक राहील.

१६. दरपत्रकातील नमूद बीड ऑफ कोटेशन ( BOQ ) व्यतिरिक्त न्यासाने सांगितलेले अतिरिक्त वाढीव काम करणे बंधनकारक असेल.

१७. दरपत्रकात नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम न देता सदरील स्वत: करणे बंधनकारक राहील.

१८. कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल, लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

१९. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

२०. दरपत्रकामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

अ. श्रीमती. वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी मोबाईल क्रमांक. ९९३०९४२४२८

ब. श्री. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी मोबाईल क्रमांक. ९३२४९९९०९४

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई –४०००२८
S.k.Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt of Maharashtra)
TEL : 022-6249 1111, 022- 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

क. श्री. मंगेश कुंटे, पर्यवेक्षक मोबाईल क्रमांक. ९७०२०२०३४२

ड. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालय

दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११, ०२२–६२४९१११२

( वीणा पाटील )
कार्यकारी अधिकारी